**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती , अंतर्गत**

**सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय, संत तुकाराम चौक ,अकोला (२१४)**

**राष्ट्रीय सेवा योजना**

**विशेष श्रमसंस्कार शिबीर ( शैक्षणिक सत्र २०२३-२०२४ )**

**कालावधी – दि. २०/०२/२०२४ ते २७/०२/२०२४**

**दत्तक ग्राम येवता , ता . जि . अकोला**

**निबंधात्मक अहवाल्**

सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय, अकोला यांचे वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर धम्मभूमी विपश्यना केंद्र कुशीनगर , दत्तक ग्राम येवता , ता. जि. अकोला येथे महाविद्यालयाचे संस्थापक सचिव मा. श्री . बी. पी. पवार , प्राचार्य डॉ. जयंत बोबडे , राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. गजेन्द्र श्रीरंग वासनिक ,महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. संगिता तिहिले व रासेयो सल्लागार समितीचे सर्व सभासद मार्गदर्शनाखाली घेण्यात आले .

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती , अंतर्गत " युवा भारत –विकसित भारत –सशक्त भारत " आणि बंधारा निर्मिती तसेच विविध उपक्रम या शिबिरातून राबविण्यात आले.

दि. २०/०२/२०२४

मंगळवार दि. २० फेब्रु. २०२४ रोजी दत्तक ग्राम येवता येथील धम्मभूमी विपश्यना केंद्रामध्ये शिबिराची पूर्व तयारी व परिसर स्वच्छता करण्याकरिता प्रस्थान करण्यात आले. शिबीर परिसर स्वच्छ केल्यानंतर संध्याकाळी वनबंधारा प्रकल्प राबविण्यासाठी काही गावकरी आणि स्वयंसेवकाच्या मदतीने प्रकल्प स्थळाची पाहणी करण्यात आली.

दि. २१ /०२ /२०२४

बुधवार दि. २१ फेब्रु.२०२४ रोजी सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. दु. ३.०० वाजता विशेष शिबिराच्या उद्घाटनासाठी उद्घाटक म्हणून सौ. वंदनाताई शिरसाट ,सरपंच ग्रामपंचायत येवता ,अकोला हे उपस्थित होते. महाविध्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत बोबडे , सौ. सुलभाताई सोळंखे सभापती पंचायत समिती अकोला, उपसरपंच श्री. गोपाल हागे, ग्रामसेवक ज्योती आठवले, सौ. बेबीनंदा शिरसाट (मुख्याध्यापिका),सौ.संतोषी वाडेकर ग्रा.पं. सदस्या येवता ,धम्मकिर्ती गोपनारायण,अक्षय जायले, सम्राट सरकटे,शेख रज्जु शेख रशीद (समाजसेवक ), कार्यक्रम अधिकारी डॉ. जी.एस. वासनिक , महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.संगिता तिहिले यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. शिबिरार्थींच्या प्रसन्न व उत्साहवर्धक सहभागाने उद्घाटन सोहळा आनंदात पार पडला. सायंकाळी ७.३० वाजता रासेयो तर्फे गटचर्चा व शिबीरार्थिचा परिचय घेण्यात आला.

दि. २२/०२/२०२४

गुरुवार दि.२२ फेब्रु. २०२४ रोजी सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. सकाळी ९.०० ते १२.३० या वेळेत प्रभात फेरी तसेच ग्रामस्थ व रासेयो शिबीरार्थि यांच्या सहभागाने पथनाट्य सादर करण्यात आले. दुपारी ३.००ते ४.०० वाजता विशेष शिबिराच्या पहिल्या बौद्धिक सत्रात "संविधान जनजागृती"या विषयावर प्रा. डॉ. विनोद खैरे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. दुपारी ४.०० ते ५.०० या दुसऱ्या सत्रात "आरोग्य विषयक मार्गदर्शन" या विषयावर निसर्गोपचार तज्ञ डॉ. धम्मपाल सुरेन्द्र दाभाडे यांनी मार्गदर्शन करून आरोग्य तपासणी केली. रात्री ८.००ते १०.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये काही स्वयंसेवकांनी वादविवाद , गायन,नृत्य,वकृत्व स्पर्धेमध्ये आपल्या कलेचे सादरीकरण केले.

दि. २३/०२/२०२४

शुक्रवार दि. २३ फेब्रु. २०२४ रोजी सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. सकाळी ९.०० ते १२.०० या वेळेत "वनबंधारा" प्रकल्पासाठी श्रमदान करण्यात आले. दुपारी ३.००ते ४.०० वाजता विशेष शिबिराच्या पहिल्या बौद्धिक सत्रात "संत गाडगे बाबांचे विचार आणि वैज्ञानिक दृष्टीकोन व जादूटोणा विरोधी कायदा" या विषयावर प्रा.डॉ.संजय तिडके यांनी मार्गदर्शन केले.दुपारी ४.०० ते ५.०० या दुसऱ्या सत्रात "डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कार्य आणि विचार" या विषयावर प्रा.डॉ.संजय तिडके यांनी मार्गदर्शन केले.रात्री ८.००ते १०.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये "बेटी बचाओ – बेटी पढाओ "ही नाटिका शिबीरार्थी स्वयंसेवकांनी सादर केली.

AKOLA

दि. २४/०३/२०२४

शनिवार दि. २४ फेब्रु. २०२४ रोजी सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. सकाळी ९.०० ते १२.०० या वेळेत "वनबंधारा" प्रकल्पासाठी श्रमदान करण्यात आले. दुपारी ३.००ते ४.०० वाजता विशेष शिबिराच्या पहिल्या बौद्धिक सत्रात "महिला सक्षमीकरण" या विषयावर शीला घरडे यांनी मार्गदर्शन केले.दुपारी ४.०० ते ५.०० या दुसऱ्या सत्रात "मुलींचे / महिलांचे पोषण सक्षमीकरण " या विषयावर प्रा.डॉ.सोनल कामे सदस्य रा.से.यो.सल्लागार समिती सं.गा.बा.अ.वि.अमरावती यांनी मार्गदर्शन केले.रात्री ८.००ते १०.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये "सबका साथ ,सबका विकास " या विषयावर रा.से.यो.स्वयंसेवकांनी आप-आपले विचार व्यक्त केले.

दि. २५/०२/२०२४

रविवार दि. २५ फेब्रु. २०२४ रोजी सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. सकाळी ९.०० ते १२.०० या वेळेत "वनबंधारा" प्रकल्पासाठी श्रमदान करण्यात आले. . दुपारी ३.००ते ४.०० वाजता विशेष शिबिराच्या पहिल्या बौद्धिक सत्रात "विकसित भारतामध्ये युवकांची भूमिका " या विषयावर प्रा.डॉ. एकनाथ खेडकर सरांनी मार्गदर्शन केले. दुपारी ४.०० ते ५.०० या दुसऱ्या सत्रात "बाल हक्क व बालकांचे कायदे " या विषयावर प्रा.पद्माकर सदांशिव यांनी मार्गदर्शन केले.रात्री ८.००ते १०.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये "संविधान जनजागृती"हे पथनाट्य रा.से.यो. स्वयंसेवकांनी सादर केले.

दि. २६ /०२ /२०२४

सोमवार दि. २६ फेब्रु. २०२४ रोजी सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. सकाळी ९.०० ते १२.०० या वेळेत "वनबंधारा" प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली. त्यासाठी २५० सीमेंट पोते लागलेत. या वेळेत"स्वच्छ भारत स्वस्थ भारत" या कल्पनेतून दत्तक ग्राम येवता येथील चौक,मंदिर,शाळा,रस्ते,दलित वस्ती,बौद्ध विहार येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. दुपारी ३.००ते ४.०० वाजता विशेष शिबिराच्या पहिल्या बौद्धिक सत्रात "EVM व VVPAT जनजागृती यावर EVM व VVPAT ची प्रात्यक्षिके श्री. मनोज बोपटे ,विस्तार अधिकारी ,पंचायत समिती अकोला यांनी रा. से. यो. स्वयंसेवक व गावकरी यांच्या समोर दाखवली व करवून घेतली. दुपारी ४.०० ते ५.०० या दुसऱ्या सत्रात "वन्यजीव रक्षण " या विषयावर श्री. बाळ काळणे यांनी मार्गदर्शन केले. रात्री ८.००ते १०.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमामध्येरा. से. यो. स्वयंसेवकांनी अंधश्रद्धा निर्मूलन यावर पथनाट्य सादर केले.

दि. २७ /०२ /२०२४ शिबिराचा समारोपीय सोहळा

मंगळवार दि. २७ फेब्रु.२०२४ रोजी सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. सकाळी ९.०० ते १२.०० या वेळेत प्रभात फेरी आणि रस्ते साफ करण्यात आले.यावेळी येवता येथील ग्रामस्थांचे भरपूर सहकार्य लाभले. नंतर महाविध्यालयाचे संस्थापक सचिव मा.श्री.बी.पी.पवार यांच्या अध्यक्षतेखाली,प्रमुख अतिथि प्रा.डॉ.रतनलाल येऊल जिल्हा समन्वयक, रासेयो अकोला आणि प्राचार्य डॉ.जयंत बोबडे यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या कार्यक्रमामध्ये सरपंच वंदनाताई सिरसाठ, उपसरपंच श्री.गोपाल हागे, मुकुंदराव हागे माजी तंटामुक्ती अध्यक्ष, मुख्याध्यापिका सौ.बेबीनंदा शिरसाट , धम्मकिर्ती गोपनारायण,अक्षय जायले, सम्राट सरकटे,शेख रज्जु शेख रशीद (समाजसेवक ) आणि निमंत्रित गावकरी यांची उपस्थिती होती. यावेळी अनेक विध्यार्थ्यांनी शिबीराविषयी आपले मनोगत व्यक्त केले.

या शिबीराच्या यशस्वितेकरिता स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. या शिबीराचे फलित म्हणजे विध्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास साधने, त्यांना विचारमंच उपलब्ध करून देणे,त्यांची बौद्धिक उंची वाढविणे,ग्रामीण जीवनाशी सुसंगत होणे यासारख्या बाबी या शिबीराच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या सात दिवसीय निवासी शिबीरामध्ये स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

रासेयो कार्यक्रम अधिकारी

Programme Officer
National Service Scheme
Sudhakarrao Naik Arts &
Umashankar Khetan Commerce
College,AKOLA

S.N. ARTS, SCIENCE & U.K. COMM. COLLEGE
AKOLA

प्राचार्य

Jayant

प्राचार्य,
सुधाकरराव नाईक कला, विज्ञान
व उमाशंकर खेतान वाणिज्य
महाविद्यालय, अकोला